प्रेसनोट दिनांक – २९/०७/२०१७

---

**गुंड शहबाज मुख्तार शेख टोळीतील चौघेजण मोक्का कायदा अंतर्गत जेरबंद**

---

मा. रश्मि शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त पुणे यांनी पुणे शहर परिसरातील अस्तित्वात व कार्यरत असलेल्या व आपले गुन्हेगारी कृत्याने वर्चस्व निर्माण करणारे टोळींचा समुळ नायनाट करण्यासाठी व त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

**खडक पोलीस स्टेशनचे हद्दीत शहाबाज मुख्तार शेख याने सन २०१४ पासुन (१)योगेश मारुती गायकवाड, रा. महादेव मंदीर पाठीमागे कोसवाडी भवानी पेठ पुणे, (२)अजय ऊर्फ बटल्या संतोष कांबळे रा. कासेवाडी पोलीस चौकीचे पाठरमागे, (३)राहुल ऊर्फ गुरुजी गणेश नेटके रा. कासेवाडी पोलीस चौकीचे पाठीमागे यांचेसह आपली स्वतःची संघटीत टोळी तयार करुन प्रत्येक वेळी आपले साथीदारांना बरोबर घेवुन त्यांचेसह गंभीर दुखापतीचे तीन, जबरी चोरीचे तीन, घरफोडी चोरीचे दोन असे एकुण दहा गुन्हे केलेले आहेत. त्यास सन २०१७ मध्ये दोन वर्षाकरिता पुणे शहर व जिल्हयातुन तडीपार करण्यात आले होते.**

**योगेश मारुती गायकवाड याचेविरुध्द खुनाचा प्रयत्नाचा एक, दुखापतीचा एक, जबरी चोरीचे दोन असे एकुण पाच गुन्हे दाखल आहेत.**

**अजय ऊर्फ बटल्या संतोष कांबळे याचेविरुध्द खुनाचा प्रयत्नाचा एक, जबरी चोरीचे दोन, गंभीर दुखापतीचे दोन, घरफोडीचा एक असे सहा गुन्हे दाखल आहेत.**

**राहुल ऊर्फ गुरुजी गणेश नेटके याचेविरुध्द जबरी चोरीचे तीन व घरफोडी चोरीचे दोन असे एकुण पाच गुन्हे दाखल आहेत.**

आरोपी यांनी अशाप्रकारे आपली टोळी तयार करुन संघटीतरित्या गुन्हे केल्याचे आढळुन आल्याने त्यांचेविरुध्द मोका कायदा अंतर्गत कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव मा. रविंद्र सेनगावकर अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर यांचेकडे पाठविण्यात आलेला होता त्याबाबत त्यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३ (१) (।।), ३ (४) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यानुसार सर्व आरोपी विरुध्द मोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.

डॉ. बसवराज तेली पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १ पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी व श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) व सहायक पोलीस निरीक्षक जे. सी. मुजावर, पोलीस उप निरीक्षक आनंत व्यवहारे, संजय गायकवाड, भरत चपाईतकर व पोलीस कर्मचारी सर्फराज शेख, महेश बारवकर, महेश कांबळे, अनिकेत बाबर, राहुल जोशी यांनी सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास शहर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीते हे करत आहेत.